# शंकरशेठ शिष्यवृत्तीचे पहिले मानकरी : यशवंत वासुदेव आठल्ये



**'मरतानाहि मातु:श्री मजवर उपकार करून गेली.'**

'मुंबई विद्यापीठ आणि जगन्नाथ शंकरशेट' हा लेख 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रकाशित होताच एक स्त्री एक पुस्तक घेऊन कचेरीत दाखल झाली. संस्कृत शिष्यवृत्त्यांची ही उज्वल परंपरा महाराष्ट्रात ज्यांच्यापासून सुरू झाली त्या विद्वान पंडिताची ती नातसून होती. १८६६ मध्ये पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती ज्यांनी मिळविली त्या कै. यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब आठल्ये यांचे चरित्र तिने संपादकांच्या स्वाधीन केले. वृत्तपत्राच्या कचेरीत काही विषय चालून येतात ते हे असे. आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाबद्दलची उदात्त भावना कुणाला अशी सहज ओढून आणते.

जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीच्या या पहिल्या मानकऱ्याचे चरित्र लिहिले आहे तेही एका असामान्य लेखकाने. रियासतकार सरदेसाईंनी अतिशय जिव्हाळ्याने कै. बापूसाहेब आठल्ये यांच्या जीवनाचे विविध पैलू उकलून दाखविले आहेत. माझे जीवन बापूसाहेबांनीच घडविले, असे सांगून त्यांच्या मोठेपणाचा एकच दाखला त्यांनी दिला आहे. ''लोकमान्य टिळक कै. आठल्ये यांना गुरुस्थानी मानीत आणि हरएक बिकट प्रसंगी प्रथम ते त्यांचा सल्ला घेत, ही एकच गोष्ट बापूसाहेबांची खरी योग्यता सिद्ध करण्यास पुरेशी आहे.'' असें त्यांनी म्हटले आहे.

अशी ही व्यक्ती होती तरी कोण? ख्यातनाम कायदेपंडित व सयाजीराव गायकवाडांचे नायब दिवाण म्हणून ज्यांचे नाव गाजले ते हे बापूसाहेब आठल्ये मूळ शिपोशीचे. १८५१ मधला रत्नागिरीचा त्यांचा जन्म. वडील वासुकाका आठल्ये हे शिपोशीचे इनामदार व अतिशय बुद्धिमान कायदेपंडित. त्यांच्या विद्वत्तेचा वारसा चिरंजीवाने घेतला व संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर शालेय जीवनात त्यांनी प्रभुत्व मिळविले. 'बापूच्या लेखनात आम्हा शिक्षकांची पेन्सिल कधी शिरकत नसे. चूक व्हायची नाही मग पेन्सिल कशाला वापरायची?' अशी आठवण त्यांच्या एका शिक्षकाने नमूद करून ठेवली आहे. उत्तरपत्रिकेतील मूळ मजकूर शोधावा लागणाऱ्या आजच्या अनेक विद्यार्थ्यांना हा अनुभव अतिशय विचित्र वाटेल. १८६५ मध्येच ते मॅट्रिक परीक्षेला बसायचे होते; परंतु त्यांची आई अतिशय आजारी झाली व त्या दुखण्यातच तिचा अंत झाला. कै. बापूसाहेब आठल्ये यांची परीक्षा चुकली.

परंतु तोही अखेर एक योगायोग ठरला. 'मरतांनाहि मातु:श्री मजवर उपकार करून गेली.' असे त्यांनी म्हटले आहे. कारण जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती १८६५ मध्ये सुरूच झालेली नव्हती. १८६६ मध्येच ती जाहीर झाली व कै. आठल्ये यांना पहिल्या मानकऱ्याचा हा सन्मान मिळाला. त्यावेळी रत्नागिरी हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ. भांडारकर होते. या जोडीचे गुरू-शिष्याचे नाते तेथे जे निर्माण झाले ते अखंड टिकले. जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती दरवर्षी मिळाली पाहिजे, ही ईर्षा रत्नागिरीच्या शाळेत निर्माण झाली ती या यशवंताच्या पहिल्या यशानेच. रत्नागिरी व सांगली यांच्यामधील चुरस गेल्या शतकात अनेकदा रंगली. तेथील विद्यार्थी व शिक्षक यांच्या प्रतिष्ठेचा तो प्रश्न बनला व त्यामधून संस्कृत पंडितांची एक मालिकाच महाराष्ट्रात तयार झाली. राष्ट्रीय भाषांच्या मायभाषेचे खरे संवर्धन या जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीने केले. त्या चळवळीचे पहिले पाइक म्हणजे कै. बापूसाहेब आठल्ये.

त्यावेळचे एल्फिन्स्टन कॉलेज म्हणजे ज्ञानाची खरी पाणपोई होती. १८६७ मध्ये बापूसाहेब आठल्ये या कॉलेजात दाखल झाले. डॉ. भांडारकर संस्कृतचे प्राध्यापक म्हणून तेथे होतेच. त्यांच्या मार्गदर्शनाचा व नामदार तेलंग यांच्या सहवासाचा लाभ आठल्यांना झाला. आपल्या या विश्वविद्यालयीन जीवनात कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर बापूसाहेब आठल्ये यांनी अनेक पारितोषिके मिळविली. गणित विषय घेऊन ते बी.ए. झाले व पहिले आले. संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषा घेऊन एका वर्षात ते एम.ए. झाले. १८७१ मध्ये त्यांची सीनियर फेलो म्हणून नेमणूक झाली. महादेव गोविंद रानडे हे त्या वेळीं तेथे इंग्रजीचे प्राध्यापक होते. ते रजेवर गेले तेव्हां बापूसाहेब आठल्ये यांना त्यांचे काम देणे नियमाने जरूर होते. परंतु तसे झाले नाही. तेव्हा त्यांनीं प्रिन्सिपल ऑक्झेनहॅन यांच्याकडे तक्रार केली. 'तुम्ही संस्कृतचे तज्ज्ञ, इंग्रजीचे काम तुम्हांस कसे द्यावे,' असा प्रतिप्रश्न त्यांना टाकला गेला. ''संस्कृत भाषेत बक्षिसे होती, तशी इंग्रजीत असती तर तीही मी मिळविली असती, संस्कृतपेक्षाही इंग्रजीवर माझे प्रभुत्व जास्त आहे,'' असे त्यांनी आत्मविश्वासपूर्वक उत्तर दिले. गुणग्राहकतेचा तो काळ होता. दुसऱ्या दिवशीच न्या. रानडे यांच्या जागी त्यांची नेमणूक झाली.

परंतु अशक्त प्रकृतीने त्यांना अधिक जबाबदारीची कामे अंगीकारू दिली नाहीत. हवामानाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल अशी, कोल्हापूरजवळच्या कागल जहागिरीचे मालक आबासाहेब घाटगे यांचे शिक्षक म्हणून, त्यांनी नोकरी पत्करली. अल्पावधीत आपल्या विद्वत्तेची छाप त्यांनी तेथे पाडली व आठ महिन्यांत कोल्हापूर छत्रपतींचे 'गार्डियन' म्हणून नेमणूक झाली. येथे नाव मिळाले होते, परंतु कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढत होत्या म्हणून त्यांनी वकिलीची परीक्षा देऊन मुंबई हायकोर्टात हजर होण्याचा निर्णय घेतला. एलएल.बी. च्या परीक्षेतही त्यांनी ऑर्नाल्ड पारितोषिक मिळविले. १८७६ मध्ये त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला व बापूसाहेबांच्या

जीवनाचे दुसरे पर्व सुरू झाले.
वकिलीच्या व्यवसायामुळे ते मुंबईत राहिले. त्यामुळे त्या काळच्या या नगरातील सामाजिक चळवळींशी त्यांचा संबंध येऊ लगला. विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्याशी आठल्ये कुटुंबीयांचा जुना ऋणानुबंध. त्यांच्या आग्रहावरून 'मनुस्मृति' ग्रंथाचे संशोधन व पुनर्मुद्रण बापूसाहेबांनी केले. मुंबईच्या ब्राह्मण सभेचे तेच एक संस्थापक. अनेक संस्थांचे चिटणीस म्हणून त्यांनी येथे कामे केली. भांडारकर पितापुत्र, काशिनाथपंत तेलंग, मंडलिक जिनसीवाले, लक्ष्मण रामचंद्र वैद्य, वामन शिवराम व महादेव चिमणाजी आपटे ही सर्व मंडळी बापूसाहेबांच्या रोजच्या बैठकीतील. लोकमान्य टिळकांचे तर नंतर ते एक प्रमुख सल्लागार झाले.
परंतु त्यांच्या कौटुंबिक जीवनात अतिशय अशांतता होती. पत्नी निवर्तली. दोन मातब्बर बंधू अल्पायुषी ठरले. विषण्ण मनाने प्रकृतीही खालावू लागली. कोर्टातही त्यांना जाववेना. अशा परिस्थितीत असताना बडोद्याहून सयाजीराव महाराजांची हाक आली व बापूसाहेब आठल्ये बडोदे संस्थानचे न्यायाधीश म्हणून २५ मार्च १८८७ रोजी रुजू झाले. तेथे अनेक खटले वर्षानुवर्षे पडून होते. वर्षाच्या आत सर्व काम बापूसाहेबांनी निकालात काढले. त्या वेळी बडोद्यास कोणतेही कायदे नव्हते. न्यायाधीश मर्जीप्रमाणे निकाल देत. संस्थानाच्या प्रमाणे निकाल देत. संस्थानाच्या प्रगतीला पोषक असे कायदे बनविण्याची निकड आठल्यांनी लावली व ते काम पुरे करून घेतले. प्रो. गज्जर यांच्याकडे बडोद्याचे 'कलाभवन' निर्माण करण्याचे काम सयाजीरावांनी सोपविले होते. परंतु त्यांना विद्वान सहकारी हवा होता. बापूसाहेब आठल्ये यांनी त्यांना सहाय्य दिले व या दोघांच्या प्रयत्नांतूनच बडोद्याचे 'कलाभवन' उभे राहिले.
सयाजीराव महाराजांचे अलोट प्रेम त्यांनीं संपादन केले. कर्तृत्ववान माणसांनी पारख करणाऱ्या या प्रगतिशील राजाने त्यांना नायब दिवाण म्हणून नेमले आणि त्यामधून अंतर्गत हेव्यादाव्यांना सुरुवात झाली. सयाजीराव परदेशी गेलेले असत व येथील कटकटी मिटविण्यात बापूसाहेबांचे सर्व श्रम खर्ची पडत. 'मी परत येईपर्यंत जाऊ नका,' या राजाज्ञेचा मान राखऱ्यासाठी, प्रकृती साफ ढासळली तरी आठल्ये बडोद्यातच राहिले. सयाजीराव महाराजांच्या सुधारणावादी धोरणाचा बोजवारा उडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इंग्रजांच्या स्थानिक हस्तकांशी त्यांनी अखेरपर्यंत झुंज दिली. शरीर चालेना तेव्हा २० मार्च १८९४ रोजी ते मुंबईला परतण्यास निघाले. हातात काठी होती. 'गोविंदराव संभाळा इथं' असे ते रियासतकारांना म्हणाले व आठल्ये गाडीत बसले ते पुन्हा बडोद्याला न येण्यासाठी. मुंबईला मंडलिकांच्या घरी पेडर रोडवर त्यांना आणण्यात आले आणि २९ मार्चलाच रात्री ७।। वाजता वयाच्या फक्त ४३ व्या वर्षी त्यांचे देहावसान झाले. अलोट बुद्धिमत्तेच्या जोरावर सयाजीराव महाराजांच्या दरबारापासून ते मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तींच्या सभागृहात त्यांनीं आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. निःस्वार्थी वर्तन हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. संस्कृत भाषेच्या गंगोत्रीतून समृद्ध संस्कृतीचा वारसा त्यांना लाभला व त्यांचे सबंध जीवनच कसे उजळून निघाले. या शिष्यवृत्तीच्या पहिल्या मानकऱ्याने आपला मान कर्तृत्वाने राखला व श्रेष्ठ परंपरेच्या रूपानें चिरंजीव करून ठेवला.

# बाळशास्त्री जांभेकर

पेशवाई गेली आणि देशात इंग्रजांची राजवट सुरू झाली. नवीन ज्ञान-विज्ञान आणि संस्कृती आली. अशा बिकट काळात समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखवणारा एक बुद्धिमान पुरुष जन्माला आला. त्याचे नाव गंगाधरशास्त्री जांभेकर. आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य का आले, याचे अचूक निदान करणारा हा महाराष्ट्राचा पहिला पुरुष. इंग्रजांच्या ज्ञानाचा आणि विज्ञानाचा जनतेत प्रचार केला पाहिजे, त्याशिवाय जनता जागृत होणार नाही, ही राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी या माणसाजवळ होती. लोककल्याणाच्या विविध कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे प्रचंड बौद्धिक सामर्थ्य त्यांना लाभलेले होते. बाळशास्त्री हा एक बुद्धीचा चमत्कारच होता. वयाच्या १२/१३ वर्षातच त्यांचे संस्कृत व मराठीचे अध्ययन पूर्ण झाले होते. नंतर ते मुंबईत आले. दोन-तीन वर्षांच्या आत पदवीधराला दिपवून टाकण्याइतके इंग्रजी ज्ञान त्यांनी मिळविले. शाळेत शिकत असतानाच तेथे ते गणिताचे प्राध्यापक झाले. सतराव्या वर्षी नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नेटिव्ह सेक्रेटरीच्या जागेसाठी फर्ड्या इंग्रजीत अर्ज केला. तो अद्यापि उपलब्ध आहे. त्यात संस्कृत, इंग्रजी, मराठी, उच्च गणित, भूगोल, गुजराती, बंगाली आणि फार्शी हे विषय येत असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे त्यांना प्रथम डेप्युटी सेक्रेटरी आणि दोन वर्षांनी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले.

इतक्या लहान वयात हा बहुमान त्या काळात मिळविणारे ते पहिले महाराष्ट्रीयन विद्वान होते. त्या वेळी ज्ञानाची साधने अत्यल्प होती. मुद्रणकलाही नुकतीच सुरू झाली होती. त्यावेळी पाठ्यपुस्तके तयार करून मराठी भाषेत त्यांनी रचली. ज्योतिषशास्त्र या विषयात त्यांचा अधिकार मोठा होता. 'शून्यलब्धि'वर मराठी भाषेत पुस्तक लिहिले. भारतीय शिलालेख, ताम्रपट यांचे संशोधन करून विद्वत्तापूर्ण निबंध लिहिले. इतिहास संशोधक. १०८ वर्षांपूर्वी शके १७६७ मध्ये ज्ञानेश्वरीची पहिली छापील पोथी पाठभेदासह संपादून बाळशास्त्री यांनी प्रसिद्ध केली. त्यांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्ता होती. विविध विषयांवर त्यांनी ग्रंथ लिहिले. त्यांनी मराठी भाषेतील पहिले वर्तमानपत्र 'दर्पण' सुरू केले. हे वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजीत निघत असे. म्हणून 'मराठी वृत्तपत्राचे जनक' ही पदवी त्यांना शोभत असे. त्या काळात इंग्रजीत केलेले हे वृत्तपत्रीय लेखन वाचून आजही बुद्धी थक्क होते. श्रीपती शेषाद्री याला शुद्ध करून धर्मात घेतले म्हणून त्या वेळी समाजाने त्यांचा खूप छळ केला. त्यानंतर ते लवकरच मरण पावले. आमच्या शापाने बाळशास्त्री मेले, असे ब्राह्मण फुशारकी मारत होते.

**- सुजाता सार्दळ**
ए विंग, ५०४, सन्मित्र शाळेसमोर,
गोगटेवाडी, गोरेगाव (पूर्व)
मुंबई - ४०००६३
मासिक - धर्मभास्कर ऑक्टोबर २०१५